**नियमित दिवाणी मुकदमा क्र. ७१/२०१९**

(सरिता शांताराम जळवी विरुध्द जनार्दन जयराम जळवी व.)

**:– नि. ७५ खालील आदेश –:**

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्र.वादी नं.२४अ सहदेव शिवराम पेडणेकर हा दिनांक २७/०८/२०२३ रोजी मयत झालेले असून त्यांचे विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. तरी सदरचा आदेश रद्द होवून प्रतिवादी नं. २४अ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथन असे की, प्रतिवादी क्र. २४अ हे मयत झाल्याबाबत वादीला कोणतीही समज नव्हती. त्यामुळे वारस रेकॉर्डवर घेण्यास अडचण आलेली होती. त्यामुळे प्रतिवादी क्र. २४अ यांचे वारस दाखल करण्यास विलंब झालेला आहे. त्यांचे वारस दाव्यात दाखल न झाल्यास वादी यांचे हक्कास बाधा येणारी आहे. सबब, प्रतिवादी नं.२४अ चे कायदेशीर वारस दाखल करण्यास झालेला विलंब माफ होऊन त्यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी असावी व तशी दाव्यात दुरुस्ती करण्यास व प्रतिवादी क्र. २४अ विरुध्द झालेला अबेट आदेश रद्दबातल करण्यात यावा अशी विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १७ब यांनी सदर अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादीचे म्हणणे असे की, अर्जातील मजकुर संयुक्तीक नाही करीता अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

०४. मुदतीचा कायदा आर्टीकल १२० नुसार दाव्यातील एखादा पक्षकार मयत झाल्यास मृत्युच्या तारखेपासून ९० दिवसांच्या आत मयत पक्षकाराच्या कायदेशीर प्रतिनिधींना दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेणे आवश्यक असते. त्याचबरोबर अशा मयत पक्षकाराबाबत दावा उपशमित झाल्यास आर्टीकल १२१ नुसार ६० दिवसांच्या आत तो आदेश रद्द करुन घेणे आवश्यक आहे.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी नं. २४अ सहदेव शिवराम पेडणेकर हे दिनांक २७/०८/२०२३ रोजी मयत झाला आहे. त्यामुळे मृत्यू तारखेपासून पुढे ९० दिवसांचे आत त्यांचे वारसाबाबत दाव्यामध्ये तजवीज करणे आवश्यक होते. परंतु प्रतिवादी नं. २४अ यांचे कायदेशीर प्रतिनिधी मुदतीत अभिलेखावर दाखल न केल्यामुळे प्रतिवादी क्र. २४अ विरुध्द दावा उपशमित झालेला आहे. प्रस्तुतचा दावा, हक्क प्रस्थापना होऊन दावा मिळकतीचे सरस निरस धडेवाटप होऊन पृथक कब्जा मिळणेसाठी तसेच रे.दि.मु.नं. १७/२०११ मधील जजमेंट व हुकुमनामा वादीवर बंधनकारक नसून तो रद्द करणेत यावा यासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. परंतु वादी यांनी सदरचा अर्ज विलंबाने दिलेला होता. सदरचा विलंब हा नि. ७४ च्या आदेशान्वये माफ करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादी नं. १ विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्दबातल करणे उचीत होईल. प्रतिवादीचे क्र. २४अ चे कायदेशीर वारस रेकॉर्डवर आणण्यास झालेल्या विलंबामुळे प्रतिवादी व न्यायालयाचा वेळ खर्ची झाल्याने वादी यांचेवर योग्य तो खर्च लावणे आवश्यक आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

१. नि. ७५ कडील अर्ज वादी यांनी प्रतिवादीला रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी खर्चाची रक्कम दिल्यानंतर मयत प्रतिवादी नं. २४अ विरुध्द दावा उपशमित झाल्याबाबत करण्यात आलेला आदेश रद्द करण्यात येत आहे.

३. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.03.30 13:09:39 +0530

दिनांक- २८/०३/२०२४

(प.रा.ढोरे )
सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.